RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १७७] मंगळवार, डिसेंबर ९, २०२५/अग्रहायण १८, शके १९४७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४५५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ०९ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक एच.डी.११०२२/९/२०२३-पोल १अ.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ च्या खंड (ख) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेले सर्व विद्यमान नियम, आदेश व संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या कार्यालयातील पोलीस उप महानिरीक्षक किंवा अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन (तांत्रिक), गट-अ, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ, आणि पोलीस उप अधीक्षक किंवा सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ, या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे :-

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांस, पोलीस उप महानिरीक्षक किंवा अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन (तांत्रिक), पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप आयुक्त, मोटार परिवहन आणि पोलीस उप अधीक्षक किंवा सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०२५, असे म्हणावे.

(२) हे नियम, ते महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) “नियुक्ती प्राधिकारी” याचा अर्थ, मुख्यमंत्री, जे, पोलीस उप महानिरीक्षक किंवा अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन (तांत्रिक), गट-अ व पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ, या पदावर उमेदवाराची नियुक्ती करणारे सक्षम प्राधिकारी असतील आणि गृहमंत्री, जे, पोलीस उप अधीक्षक किंवा सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ या पदावर उमेदवाराची नियुक्ती करणारे सक्षम प्राधिकारी असतील, असा आहे;

(ख) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे;

(ग) "पदवी" याचा अर्थ, एखाद्या सांविधिक विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वयंचलित्र अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली, अन्य कोणतीही अर्हता, असा आहे;

(घ) "पोलीस महासंचालक" याचा अर्थ, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नियुक्त करण्यात आलेले पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(ङ) "पदोन्नतीची पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी काढलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता, असा आहे;

(च) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(छ) "गृह विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा गृह विभाग, असा आहे;

(ज) "अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालय" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पोलीस महासंचालक यांच्या आस्थापनेवरील, अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, असा आहे.

**३.** पोलीस उप महानिरीक्षक किंवा अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन (तांत्रिक), गट-अ या पदावरील नियुक्ती, अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयातील, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल;

परंतु, जर पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ या संवर्गातील पात्र व्यक्ती उपलब्ध होत नसेल तर, पोलीस उप महानिरीक्षक किंवा अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन (तांत्रिक), गट-अ या पदावर भारतीय पोलीस सेवेतील योग्य व्यक्तीची बदलीद्वारे नियुक्ती करण्यात येईल.

**४.** पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ या पदावरील नियुक्ती पोलीस उप अधीक्षक किंवा सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

**५.** पोलीस उपअधीक्षक किंवा सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन, गट-अ या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन, गट-अ हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ख) आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या, पुढील निकषांची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

**(एक) वयोमर्यादा.—**

(क) किमान वयोमर्यादा.—उक्त पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास, अठरा वर्षे वय पूर्ण केलेले असावे.

(ख) कमाल वयोमर्यादा.—उक्त पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास, राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी अडतीस वर्षे वय पूर्ण केलेले व राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षे पूर्ण केलेले असावे.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.—**

एखाद्या सांविधिक विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वयंचलित्र अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण केलेली असावी.

**(तीन) अतिरिक्त अर्हता.**—ती व्यक्ती, आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास, मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या प्रकरण दोन अन्वये लायसन देण्याकरिता प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे दिलेली जड वाहने चालविण्याचे वैध चालन लायसन धारण करील;

परंतु, जर, अशा व्यक्तीने, आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास जड वाहने चालविण्याचे वैध चालन लायसन धारण केले नसल्यास, अशी व्यक्ती परिवीक्षाधीन कालावधी पूर्ण होण्यापूर्वी असे वैध चालन लायसन प्राप्त करील, असे चालन लायसन प्राप्त करण्यास अपयशी ठरल्यास त्याची सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल. अशी व्यक्ती कोणताही खंड पडू न देता, वेळोवेळी, उक्त चालन लायसन धारण करील.

**(चार) शारीरिक अर्हता.**—

(क) पुरुषांकरिता शारीरिक प्रमाण.—

(एक) किमान उंची (से.मी.मध्ये) १६५ से.मी. (अनवाणी)

(दोन) छाती न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी आणि न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा.

(ख) महिलांकरिता शारीरिक प्रमाण.—किमान उंची (से.मी.मध्ये) १५७ से.मी. (अनवाणी)

(ग) दृष्टी.—दुरुस्तीसह किंवा विनादुरुस्ती उत्तम दृष्टी व वर्णांध नसावी.

**६.** नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदाच्या एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ५०:५० असे राहील.

**७.** नियम ३ ते ५ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्त्या, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येतील.

**८.** नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीला, या पदाकरिता विहित केलेली विभागीय परीक्षा, विहित केलेल्या कालमर्यादेत उत्तीर्ण करणे आवश्यक असेल. जर, अशी व्यक्ती उक्त पदाकरिता विहित केलेली उक्त विभागीय परीक्षा, विहित केलेल्या कालमर्यादेत उत्तीर्ण झाली नाही तर, ती व्यक्ती, उक्त परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा उक्त परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेपर्यंत, उक्त पदावर कायम राहू शकणार नाही किंवा उच्च पदावरील पदोन्नतीकरिता पात्र ठरणार नाही.

**९.** नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती झालेल्या आणि एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) या अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारास, त्याच्या सेवाज्येष्ठतेच्या संबंधातील बाबी, विभागीय परीक्षा व इतर सेवा संबंधित बाबी यांचे, सामान्य प्रशासन विभागाद्वारे, वेळोवेळी काढलेल्या नियम व विनियम यानुसार विनियमन करण्यात येईल. तथापि, जर अशी व्यक्ती विहित केलेल्या कालमर्यादेत उक्त प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) समाधानकारकरीत्या पूर्ण करण्यात अपयशी झाली तर, तिची सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

**१०.** (क) नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करेल.

(ख) नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, ती व्यक्ती, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**११.** (क) नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, पुढील पदोन्नतीच्या पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, त्याबाबतीत, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

(ख) नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीने, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, याबाबतीत, शासनाने वेळोवेळी विहित केलेले असे संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील, अन्यथा अशी व्यक्ती, असे प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**१२.** (१) नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार किंवा याबाबत, शासनाने, वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील, अन्यथा अशी व्यक्ती उक्त पदावर नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास, दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यास अनर्ह ठरेल.

**१३.** नियम ३ ते ५ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींची जेष्ठता यादी राज्यस्तरावर ठेवली जाईल. म्हणून उक्त पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

**१४.** शासनाने, वेळोवेळी निर्गमित केलेले कोणतेही नियम किंवा घेतलेले निर्णय यांमध्ये, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीआधी किंवा नंतर, शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यंकटेश भट,**
शासनाचे सहसचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg,Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032.
dated the 9th December, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. H.D.11022/9/2023-Pol 1A.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951) and in supersession of all existing rules, orders and instruments made in this behalf, the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Deputy Inspector General of Police or Additional Commissioner of Police, Motor Transport (Technical), Group A, Superintendent of Police or Deputy Commissioner of Police, Motor Transport, Group A and Deputy Superintendent of Police or Assistant Commissioner of Police, Motor Transport, Group A, in the Office of the Additional Director General of Police and Director, Police Communication, Information Technology and Transport Department, Maharashtra State, Pune under the administrative control of the Home Department of Government of Maharashtra, namely:—

**1.** *Short title and commencement.*-—(1) These rules may be called the Deputy Inspector General of Police or Additional Commissioner of Police, Motor Transport (Technical), Superintendent of Police or Deputy Commissioner of Police, Motor Transport and Deputy Superintendent of Police or Assistant Commissioner of Police, Motor Transport, Group A, (Recruitment) Rules 2025.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Maharashtra Government Gazette*.

**2.** *Definitions.*—In these rules, unless the context requires otherwise,-

(*a*) "Appointing Authority" means the Chief Minister who shall be the competent authority to appoint a candidate to the post of Deputy Inspector General of Police or Additional Commissioner of Police, Motor Transport (Technical), Group A, and Superintendent of Police or Deputy Commissioner of Police, Motor Transport, Group A and the Home Minister who shall be the competent authority to appoint a candidate to the post of Deputy Superintendent of Police or Assistant Commissioner of Police, Motor Transport, Group A;

(*b*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(*c*) "Degree" means a degree in Mechanical Engineering or Automobile Engineering of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*d*) "Director General of Police" means the Director General and Inspector General of Police, Maharashtra State appointed under section 6 of the Maharashtra Police Act.

(*e*) "eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in the rules, resolutions or orders issued by the General Administration Department, from time to time;

(*f*) "Government" means the Government of Maharashtra;

(*g*) "Home Department" means Home Department of the Government of Maharashtra;

(*h*) "Office of Additional Director General of Police and Director, Police Communication, Information Technology and Transport Department, Maharashtra State, Pune" means the Office of the Additional Director General of Police and Director, Police Communication, Information Technology and Transport Department, Maharashtra State, Pune, on the establishment of the Director General of Police, under the administrative control of the Home Department of Government of Maharashtra ;

**3.** Appointment to the post of Deputy Inspector General of Police or Additional Commissioner of Police, Motor Transport, (Technical), Group A, shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion holding the post of Superintendent of Police or Deputy Commissioner of Police, Motor Transport, Group A, in the Office of the Additional Director General of Police and Director, Police Communication, Information Technology and Transport Department, Maharashtra State, Pune, having a regular and continuous service of not less than ten years in the said post:

Provided that, if no suitable person is available in the cadre of Superintendent of Police or Deputy Commissioner of Police, Motor Transport, Group A, a suitable person in the Indian Police Service shall be appointed by transfer to the post of Deputy Inspector General of Police or Additional Commissioner of Police, Motor Transport (Technical), Group A.

**4.** Appointment to the post of Superintendent of Police or Deputy Commissioner of Police, Motor Transport, Group A, shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion, holding the post of Deputy Superintendent of Police or Assistant Commissioner of Police, Motor Transport, Group A, having a regular and continuous service of not less than five years in the said post.

**5.** Appointment to the post of the Deputy Superintendent of Police or Assistant Commissioner of Police, Motor Transport, Group A, shall be made either by,-

(*a*) promotion of suitable person having eligibility for promotion, holding the post of Police Inspector, Motor Transport, Group A, having a regular and continuous service of not less than three years in the said post ; or

(*b*) nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, who fulfil the following criteria, namely :—

*(i) Age limit.—*

(A) Lower Age limit.—Eighteen years of age should be completed as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age limit.—Thirty-eight years of age completed for the persons not belonging to a reserved category and forty-three years of age completed for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(*ii*) *Minimum Educational Qualification.*—Possesses a degree in the Mechanical Engineering or Automobile Engineering of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto.

(*iii*) *Additional Qualification.*—The person shall possess, on last date of submission of application for the competitive examination held by the Commission, a valid driving license to drive heavy vehicles, issued by the competent authority authorized to issue license under Chapter II of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988).

Provided that, if a person does not possess a valid driving license to drive heavy vehicles on last date of submission of application for the competitive examination held by the Commission, such person shall, before the completion of the probation period, obtain such a valid driving license, failing which he shall be liable to termination of service. Such person shall, without any break, have the said driving license from time to time.

*(iv) Physical Eligibility.—*

(A) Physical standards for male.—

(I) Minimum height (in centimetres) 165 centimetres (barefooted);

(II) Chest girth shall not be less than 79 centimetres deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimetres.

(B) *Physical standards for female.*—Minimum height (in centimetres) 157 centimetres (barefooted).

(C) *Vision.*—Good vision with or without correction and shall not be colour blind.

**6.** Appointment to the post mentioned in rule 5 by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50, respectively, for the total number of sanctioned posts to be filled under rule 5.

**7.** The appointments to the posts mentioned in rules 3 to 5 shall be made with the approval of the Appointing Authority.

**8.** A person appointed to the post mentioned in rule 5 by nomination, shall be required to pass the prescribed Departmental Examination for the post within the prescribed limit. If such person fails to pass the said prescribed Departmental Examination for the post within the prescribed limit then he shall not be confirmed on the said post or be eligible for promotion to the higher post until he passes the said examination or has been exempted from passing the said examination.

**9.** A person appointed to the post mentioned in rule 5 by nomination and undergoing training under the Combined Probationary Training Programme (CPTP), service matters pertaining to seniority, Departmental examination and other service matters shall be regulated by rules and regulations by the General Administration Department, from time to time. However, if a person fails to complete the said training programme (CPTP) satisfactorily, within the prescribed period, his services shall be liable to be terminated.

**10.** (*a*) A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 and 5 by promotion shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the next promotional post.

(*b*) A person appointed to the posts mentioned in rule 5 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within prescribed time limit after appointment unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or for promotion to the next promotional post, until he passes those examinations.

**11.** (*a*) A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 and 5 by promotion shall possess a certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the next promotional post.

(*b*) A person appointed to the posts mentioned in rule 5 by nomination shall possess a certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such certificate of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment or for the promotion to the next promotional post, until he possesses such certificate.

**12.** (*1*) A person appointed to the post mentioned in rule 5 by nomination shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf, by the Government, from time to time, otherwise he shall not be eligible for appointment to the post.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family, shall be disqualified for the appointment in Government Service.

(*3*) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children, then he shall be disqualified for the appointed post in Government service.

**13.** The seniority list of the persons appointed to the posts mentioned in rules 3 to 5 shall be maintained at State level. Therefore, such persons shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

**14.** The terms and conditions specified by the Government, in any rules or resolutions issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall be applicable to the concerned Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VENKATESH BHAT,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.